लोकमत

# मराठी भाषा दिन सोहळ्याचा ग्रंथदिंडीने प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठात विविध कार्यक्रम : मराठी विभागात तीन दिवस आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'मराठी भाषा गौरव दिन सोहळ्या'ला बुधवारी सकाळी ग्रंथदिंडीने उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. या सोहळ्यांतर्गत मराठी अधिविभागात तीन दिवस विविध कार्यक्रम होणार आहेत.

या ग्रंथदिंडीचा प्रारंभ सकाळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पालखीपूजनाने झाला. ओव्या-अभंग म्हणत विद्यार्थी-विद्यार्थिनी दिंडीत मोठ्या उत्साहात सहभागी झाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर टाळ-मृदंगाच्या गजरात विद्यापीठ परिसरातून दिंडी काढण्यात आली. दिंडीत प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. नंदकुमार मोरे यांच्यासह शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या. त्यानंतर मराठी अधिविभागात 'महाराष्ट्राची कीर्तन परंपरा' या विषयावर कुंडलिक पाटील यांचे व्याख्यान झाले. दुपारी ग. दि. माडगूळकर जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'राम जोशी' हा चित्रपट दाखविण्यात आला.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी 'मराठी भाषा गौरव दिन सोहळ्या'ला ग्रंथदिंडीने प्रारंभ झाला. पालखीपूजन प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी नमिता खोत, नंदकुमार मोरे, विलास नांदवडेकर, व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

### आज विविध कार्यक्रम

आज, गुरुवारी सकाळी अकरा वाजता 'म्हणींतले समाजदर्शन : पश्चिम महाराष्ट्रातील म्हणी विशेष' या विषयावर विद्यार्थी सादरीकरण करतील. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयसिंगपूरचे डॉ. मोहन पाटील उपस्थित असतील. शुक्रवारी (दि. १ मार्च) दुपारी बारा वाजता 'रंग लोककलेचे' हा विशेष कार्यक्रम अवतांबर शिरढोणकर आणि त्यांचे सहकारी सादर करतील.

पुढारी

# 'बोलु कवतिके'तून मराठीचा जागर

## शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मराठी साहित्य, साहित्यिक गीत नाट्य सादरीकरणासह मराठीतील प्रथम शिलालेख हस्तलिखितांच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात मराठी भाषेचा जागर करण्यात आला. सुरभीनिर्मित 'बोलु कवतिके' या कार्यक्रमातून रसिकांना मराठी भाषेची मेजवाणी मिळाली.

मराठी भाषागौरव दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे निर्मित 'बोलु कवतिके' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. भाषा भवनमध्ये झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी ओमकार भिसे यांनी कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. विविध प्रकारच्या ६० ध्वनिचित्रफितींच्या माध्यमातून मराठीतील विविध कलाकृतींची माहिती देण्यात आली. यामध्ये श्रवणबेळगोळ येथे असणाऱ्या



कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे सुरभी पुणेनिर्मित 'बोलु कवतिके' या कार्यक्रमात कलाकारांनी आपली कला सादर केली. (छाया : पप्पू अत्तार)

गोमटेश्वरावरील मूळ शिलालेख हा मराठीतील पहिला शिलालेख उपस्थितांना पाहण्यास मिळाला; तर मराठीतील पहिल्या हस्तलिखिताचेही दर्शन घडले. यमुनाबाई वाईकर, पठ्ठे बापूराव, राम जोशी यांच्या लावणीचा रसिकांना आस्वाद घेता आला. अशोक काळे यांनी 'गर्जा महाराष्ट्र माझा', हेमंत वाळुंजकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'जयदेव जयदेव' हे गीत सादर केले. मंजिरी जोशी, केदार परांजपे यांनी 'माळ्याच्या मळ्यामधी' गीते सादर केली.

'सुंदरा मनामध्ये भरली', 'सोळावं वरीस धोक्याचं', 'माझी मैना' आदींसह अन्य विविध लावण्यांनी उपस्थितांची करमणूक केली. तसेच गीत संगीताच्या मैफलीत मोगरा फुलला, या जन्मावर, द्रौपदीचे बंधू, याला कुठवर आवरावं, कुणाच्या खांद्यावर, गीतरामायण, कुश-लव रामायण गाती, मालवून टाक दीप, ने मजसी ने परत, जय देव शिवराया अशी अनेक श्रवणीय गीते सादर करून मराठी भाषेच्या वैभवाची जाणीव रसिकांना करून देण्यात आली.

उद्घाटनपर कार्यक्रमात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी कार्यक्रमाचा हेतू विशद करून अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी भाषा विकसित होण्यास मदत होईल, असे सांगितले. यंदा मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'म्हण जपा, मन जपा' 'म्हण जपा, धन जपा' हा संदेश देण्यात आला.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ओमकार भिसे आणि मोहन पारसनीस यांनी स्वागत केले. सुरेखा आडके यांनी आभार मानले.

लोकमत

# ‘बोलू कवतिके...’मधून मराठी परंपरेचे दर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ओवी, अभंग, लावणी, पोवाडा, कविता, नाट्यगीते ते चित्रपट अशा या समृद्ध परंपरेचे दर्शन बुधवारी सायंकाळी ‘बोलू कवतिके’ या नृत्य, नाट्य आणि संगीतमय दृक्‌श्राव्य माध्यमातून शिवाजी विद्यापीठात घडले. निमित्त होते ‘मराठी भाषा गौरव दिना’चे.

शिवाजी विद्यापीठ, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे विद्यापीठातील वि. स. खांडेकर सभागृहात मराठी भाषेच्या गौरवशाली सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पुणे येथील सुरभी संस्थेच्या वतीने हा कार्यक्रम सादर केला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

मराठी भाषेला लोकपरंपरा आणि लोकसाहित्याची समृद्ध परंपरा लाभली आहे. तिची ओळख ‘बोलू कवतिके’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थितांना झाली. कार्यक्रमाची सुरुवात ‘जय शारदे’ या दृक्‌श्राव्य माध्यमातून झाले. त्यानंतर मोगरा फुलला, या जन्मावर, भरजरी गं, कुणाच्या खांद्यावर ही गीते सादर केली. ‘गीतरामायण’मधील स्वये श्री, राम जन्मला, पराधीन आहे ही गीते सादर केली. गर्जा महाराष्ट्र माझा, जयदेव जयदेव या गाण्यांनंतर मम आत्मा, परवशता, घेई छंद, राजाच्या रंगम्हाली माळयाच्या मळ्यामंदी, पंचमीचा सण ही नाट्यगीते सादर केली. तर ‘सुंदरा मनामध्ये’ आणि ‘गाडी आणावी’ ही लावणी सादर केली. कार्यक्रमाची निर्मिती ओंकार भिसे आणि मोहन पारसनीस यांनी केली होती; तर संहितालेखन प्रवीण जोशी यांनी केले. एकूण २२ कलाकारांनी यामध्ये सहभाग घेतला होता. याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले.




**कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठ व उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्यातर्फे बुधवारी सायंकाळी विद्यापीठातील वि. स. खांडेकर सभागृहात 'मराठी भाषा गौरव दिना'निमित्त 'बोलू कवतिके' हा सांस्कृतिक कार्यक्रम रंगला.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 FEB 2019
Times of India

# Various events mark Marathi Bhasha Gaurav Din celebration

TIMES NEWS NETWORK

Rahul Gayakwad



A cultural event oraganised in the city on Wednesday

**Kolhapur:** The Marathi Bhasha Gaurav Din, a day to celebrate Marathi language, its literature and culture, was marked by many events in the city. Shivaji University, Kolhapur campus witnessed several events.

A 'granth dindi', or procession of books placed in a palanquin was organised in the university campus. Men and women dressed in traditional Maharashtrian attire and hundreds of students participated, and SUK pro vice chancellor DT Shirke flagged off the procession.

Scholar Kundlik Patil delivered a lecture on Maharashtra's Kirtan tradition. There was also a presentation on the metaphors in Marathi and their continued relevance. A presentation on folk art is scheduled for March 1.

A participant at some of the events at the university said Marathi poets and writers have seen success with readers across the world, but some remain relatively unknown to the younger generation. "We just hope the new generation gets to know the importance of the language and its literature. Programmes like this one offer us a chance to learn about the language and literature and connect us to our roots," she said.

Marathi Bhasha Gaurav Din is observed on the birth anniversary of renowned Marathi poet and writer Vishnu Vaman Shirwadkar, who wrote under the pen name Kusumagraj.

पुढारी

# ग्रंथदिंडीने मराठी भाषा गौरव दिनास प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात बुधवारी सकाळी ग्रंथदिंडीने मराठी भाषा गौरव दिन सोहळ्यास मंगलमय वातावरणात प्रारंभ झाला. यासंदर्भातील विविध कार्यक्रम शुक्रवारपर्यंत मराठी अधिविभागात होणार आहेत. बुधवारी सकाळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पालखी पूजनाने ग्रंथदिंडीस प्रारंभ करण्यात आला. ओव्या-अभंग गात विद्यार्थी-विद्यार्थिनी दिंडीत मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून नंतर टाळ-मृदंगाच्या गजरात विद्यापीठ परिसरातून दिंडी काढण्यात आली.

दिंडीत प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. नंदकुमार मोरे यांच्यासह शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘कौशल्यात गुरुकिल्ली’

कराड : ‘पारंपरिक शालेय शिक्षणातून ज्ञान मिळते तर कला व क्रीडा कौशल्यातून यशाची गुरुकिल्ली सापडते. शिक्षणा इतकेच कला व क्रीडेला महत्त्व दिले पाहिजे,’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ व येथील महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शारीरिक शिक्षण व क्रीडा चर्चासत्राचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले.

पुढारी


# बेकारी, आर्थिक विषमता आव्हाने

## डॉ. विनायक गोविलकर : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय सकल उत्पन्नात देश सहाव्या क्रमांकावर असला तरी बेकारी, आर्थिक विषमता आणि बँक कर्ज बुडवेगिरी ही सरकारसमोरील मोठी आव्हाने आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि राज्य नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. विनायक गोविलकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील उद्योग कक्ष आणि विविध औद्योगिक संघटनांतर्फे 'स्वतंत्र भारताचा आर्थिक प्रवास' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. डॉ. गोविलकर म्हणाले, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाने भांडवलशाही आणि साम्यवादी अशा मिश्र अर्थव्यवस्थेचा अंगिकार केला. १९४७ ते १९७५ या पहिल्या टप्प्यात एकपक्षीय सरकारने देशात आर्थिक स्थिती मजबुतीसाठी धोरणे राबविली. १९७५ ते १९७७ या इंदिरा गांधी यांच्या आणीबाणीच्या काळात आर्थिक धोरणे डळमळीत झाली; तर तिसऱ्या टप्प्यात म्हणजेच १९७७ ते १९९१ या काळात विविध पक्षांची सत्ता आल्याने राजकीय सत्ता अस्थिर बनली. त्यामुळे आर्थिक सुबत्ता बिघडून महागाई वाढली. १९९१ ते १९९९ या काळात मिश्र भांडवलशाही व साम्यवादी असा प्रवास झाला. २००४ ते २००८ या काळात काँग्रेसने चांगली आर्थिक प्रगती केली. २०१४ ते २०१८ या काळात भाजप सरकारने अनेक देशहिताचे निर्णय घेतले. मात्र या काळात रोजगाराच्या संधी कमी झाल्या. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास उद्योजक चंद्रकांत जाधव, संजय शेटे, राजू पाटील, विश्वजित कुलकर्णी, मोहन पंडितराव आदींसह उद्योजक उपस्थित होते.



**कोल्हापूर : विद्यापीठातील उद्योग कक्ष आणि विविध औद्योगिक संघटनांतर्फे 'स्वतंत्र भारताचा आर्थिक प्रवास' या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. विनायक गोविलकर. (छाया : पप्पू अत्तार)**

पुढारी

# जपानी भाषेत करिअरच्या संधी

## सुहास मते : 'जपानी भाषेतील शिक्षण व करिअर संधी'वर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जपानमधील लोकसंख्येत तरुणांचे प्रमाण कमी असून, भारतात तरुणांची संख्या जास्त आहे. ऑटोमोबाईलसारख्या क्षेत्रात भारतात अनेक जपानी बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. त्यामुळे त्या भाषेत करिअरच्या खूप संधी उपलब्ध आहेत. त्याचा मराठी तरुणांनी लाभ घेतला पाहिजे, असे प्रतिपादन जपानी भाषा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुहास मते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'जपानी भाषेतील शिक्षण व करिअर संधी' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. विदेशी भाषा विभागाच्या प्र. विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे अध्यक्षस्थानी होत्या. जपानी भाषा शिक्षक संघाच्या सचिव संजीवनी कावले, पुणे यांनीही विद्यार्थ्यांच्या प्रश्नोत्तरे सत्रात मार्गदर्शन केले. जपानी भाषा शिक्षिका स्नेहल शेटे व जर्मन भाषा शिक्षिका स्नेहा वझे उपस्थित होत्या.

सुहास मते यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून जपान व तेथील संस्कृती यांचा परिचय करून दिला. जपानी भाषा ही बोलताना मराठीच्या जवळ असणारी भाषा आहे. लिपी शिकणे सुरुवातीस काहीसे कठीण वाटले, तरीही काहीच दिवसांत आपण ती वाचू शकतो. तीन वर्षे सातत्याने जपानी भाषा शिकल्यास करिअरमध्ये प्रचंड संधी असतात. विशेषत: इतर कोणत्याही विद्याशाखेतील शिक्षण आणि जपानी भाषेचे ज्ञान असेल तर आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या अतिशय समृद्ध जीवन जगता येते, असेही त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, स्वयंशिस्त, कार्यप्रवणता, उच्च जीवनशैली यामुळे जपानी लोकांचे सरासरी आयुष्यमान ८२ आहे. आज तेथे तरुणांचे प्रमाण कमी आहे. भारतात तरुणांची संख्या जास्त आहे. भारतात ऑटोमोबाईलसारख्या क्षेत्रात अनेक जपानी बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. त्यामुळे जपानी भाषेत करिअरमधील उपलब्ध संधी खूप आहेत. त्याचा मराठी तरुणांनी लाभ घेतला पाहिजे. डॉ. मेघा पानसरे यांनी चित्रलिपी, सायोनारा, हाइकू, किमोनो, चहा समारंभ, हिरोशिमा-नागासाकी अशा शब्दांतून जपानी संस्कृती उलगडत असल्याचे सांगितले.

शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा विभागामार्फत जपानी भाषेतील एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविला जातो. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या जपानी भाषा परीक्षेसाठी (JLPT) सुद्धा मार्गदर्शन केले जाते. तसेच जर्मन व रशियन भाषांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रमही शिकवले जातात. कार्यशाळेचे उद्घाटन रोपास पाणी घालून करण्यात आले. स्नेहल शेटे यांनी स्वागत केले.



शिवाजी विद्यापीठातून...

### विद्यार्थी, पालकांच्या शंकांचे निरसन

जपानी भाषा शिकणारे व शिकू इच्छिणारे अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी, व्यावसायिक व पालक कार्यशाळेत सहभागी झाले होते. यामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखा, तसेच अभियांत्रिकी, इंटिरिअर डिझाईन, फूड टेक्नॉलॉजी, नॅनो टेक्नॉलॉजी, नर्सिंग आदी व्यावसायिक शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी तसेच पालकांच्या शंकांचे निरसन केले. जपानी भाषा शिकणाऱ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्तीबाबत माहिती देण्यात आली.

लोकमत

# जपानी भाषेत करिअरच्या खूप संधी

## सुहास मते : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाची कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : भारतात ऑटोमोबाईलसारख्या क्षेत्रात अनेक जपानी बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. त्यामुळे जपानी भाषेत करिअरमधील उपलब्ध संधी खूप आहेत. त्याचा मराठी तरुणांनी लाभ घेतला पाहिजे, असे प्रतिपादन जपानी भाषा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुहास मते यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'जपानी भाषेतील शिक्षण व करिअर संधी' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. वि. स. खांडेकर सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदेशी भाषा विभागाच्या प्र. विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे होत्या. सुहास मते म्हणाले, जपानी भाषा ही बोलताना मराठीच्या जवळ असणारी भाषा आहे. लिपी शिकणे सुरुवातीस काहीसे कठीण वाटले, तरीही काहीच दिवसांत आपण ती वाचू शकतो. या कार्यक्रमात जपानी भाषा शिक्षक संघाच्या सचिव संजीवनी कावले यांनी प्रश्नोत्तरे सत्रात मार्गदर्शन केले. यावेळी जपानी भाषाशिक्षिका स्नेहल शेटे, जर्मन भाषाशिक्षिका स्नेहा वझे उपस्थित होत्या.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत जपानी भाषा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुहास मते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी मेघा पानसरे, आदी उपस्थित होत्या.

### नवे विश्व खुले

**या कार्यक्रमात डॉ. मेघा पानसरे यांनी चित्रलिपी, सायोनारा, हाइकू, किमोनो, चहा समारंभ, हिरोशिमा-नागासकी अशा शब्दांतून जपानी संस्कृती व इतिहास उलगडत असल्याचे सांगितले. आपण इतर अभ्यासक्रमांत पदवी घेण्यासाठी खूप मेहनत करतो; पण त्याच वेळेत आपण विदेशी भाषा शिकल्यास एक नवे विश्व तरुणांसमोर खुले होत असल्याचे त्यांनी सांगितले.**

# ‘गॅस सेन्सर’ शोधणार विषारी वायूंचे प्रमाण

## पदार्थविज्ञान अधिविभागातील प्राध्यापकांचे नावीन्यपूर्ण संशोधन

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

दिवसेंदिवस हवेतील प्रदूषण वाढल्याने श्वसनासह अनेक प्रकारचे आजार होऊ लागले आहेत. याला प्रतिबंध व उपाय म्हणून शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाचे प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी हवेतील विषारी वायू शोधणारा संवेदनशील गॅस सेन्सर निर्माण केला आहे. या संशोधनामुळे विषारी वायूंपासून स्वत:ला दूर ठेवून संरक्षण करता येणार आहे.



राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष

मानवाने २१ व्या शतकाकडे वाटचाल करताना विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती केली असून यामुळे नवनवीन समस्या निर्माण झाल्या आहेत. लोकसंख्येच्या गरजा पुरविण्याच्या प्रयत्नात विषारी वायू, विषारी द्रव्ये व हानिकारक पदार्थांची निर्मिती झाली आहे. कार्बन डायऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड, कार्बन मोनोक्साईड, अमोनिया, सूक्ष्म धुलिकण, वाहने, घरगुती व औद्योगिक क्षेत्रातून घातक वायूरूप पदार्थ वातावरणात मिसळले जात असल्याने सजीवांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

वातावरणामधील विषारी वायू व त्यांचे प्रमाण शोधण्याचे तंत्रज्ञान आणि विषारी रसायनांचे मूल्यमापन, नियंत्रणासाठी अनेक देशांत संशोधन सुरू आहे. **पान २ वर**

> “ पर्यावरणपूरक संशोधनाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाची निसर्गाशी असणारी नाळ संवर्धित ठेवली आहे. गॅस सेन्सरसारख्या संशोधनातून निसर्गामधील समस्यांच्या निरसनाचा प्रयत्न आहे. हे संशोधन प्रयोगस्तरावर असले; तरी लवकरच संशोधनाचे पेटंट घेण्याचा मानस आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे मार्गदर्शन लाभत आहे.
>
> **- प्रा. डॉ. पी. एस. पाटील,**
>
> अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

पुढारी

# 'गॅस सेन्सर' शोधणार विषारी वायूंचे प्रमाण

**(पान १ वरून)** शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागातील काही संशोधक प्राध्यापक गेल्या काही दशकांपासून यावर संशोधन करीत आहेत. झिंक ऑक्साईड, टिन ऑक्साईड, टंगस्टन ऑक्साईड, इंडियम ऑक्साईडचा वापर करून विषारी वायूची गळती शोधणारे विविध प्रकारचे संवेदनशील गॅस सेन्सर निर्माण करण्यात त्यांना यश आले आहे. प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी जपानमधील शिझोका विद्यापीठासमवेत अमोनिया या विषारी वायूची गळती शोधण्यासाठी अत्याधुनिक संशोधन करून झिंक ऑक्साईड गॅस सेन्सर निर्माण केले आहे. विद्यापीठ व शिझोका विद्यापीठ यांचे संयुक्तपणे पाच शोधनिबंध आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झाले आहेत. 'स्कोपस' संशोधन डाटाबेसनुसार प्रा. पाटील यांचे झिंक ऑक्साईड गॅस सेन्सर संशोधन आंतरराष्ट्रीय पातळीवर २० व्या क्रमांकावर व राष्ट्रीय पातळीवर प्रथम स्थानावर आहे. संशोधनामुळे हवेतील विषारी वायू शोधून त्यामधील विद्युतरोध कमी-जास्त करून वातावरणामधील विषारी वायूंचे प्रमाण ठरविता येणे शक्य आहे.

लोकमत

## शिवाजी विद्यापीठात विज्ञान प्रदर्शन : लक्षवेधी प्रकल्प; विद्यार्थ्यांची मोठी गर्दी

# 'सोलर ड्रायर', फळे-भाजी वर्गीकरणाचे यंत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पर्यावरणपूरक सोलर ड्रायर, फळे-भाजी वर्गीकरण करणारे यंत्र, वायरलेस वॉटर कंट्रोल मशीन, थ्रीडी इंटरनेट असे विज्ञान व तंत्रज्ञानाचे विविध प्रकल्प शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांनी बुधवारी सादर केले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शन पाहण्यासाठी लोककला केंद्रात विद्यार्थ्यांनी गर्दी केली.

विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीमार्फत राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित या प्रदर्शनाचे उद्घाटन प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, डॉ. ए. एम. गुरव, स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीचे समन्वयक डॉ. पी. एस. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत, सागर डेळेकर, आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी प्रदर्शनातील विविध प्रकल्पांची माहिती घेतली. प्रदर्शनात गोखले महाविद्यालयातील बी. एस्सी. तृतीय वर्षातील विद्यार्थी संचेत दळवी याने 'ॲटोमेटिक वॉटर ॲंड सेव्ह वॉटर' हा प्रकल्प सादर केला. त्यामध्ये त्याने स्वच्छतागृहातील पाणी वापरासाठी प्रेस कॉकच्या उपयोगाचे संशोधन मांडले. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील वैभव बागे याने 'इकोफ्रेंडली सोलर ड्रायर'चे संशोधन सादर केले. त्यामध्ये पवन, सौरऊर्जा आणि जीओ कुलिंग सिस्टिमच्या वापरातून तयार केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती दिली. अंजली भोसले आणि प्रज्ञा कांबळे यांनी फूड प्रोसेस इंडस्ट्रिजसाठी उपयुक्त ठरणाऱ्या फळे, भाजी वर्गीकरण करणारे यंत्राचे संशोधन मांडले. त्यामध्ये उत्तम दर्जाची, चांगले आणि खराब अशा विभागांमध्ये फळे आणि भाजी यांचे वर्गीकरण केले जाते. भित्तीपत्रकांच्या माध्यमातून थ्री-डी इंटरनेट, बुके पेपर, नॅनो मेडिसीन, आदींबाबतचे संशोधन, अभ्यासाची माहिती विद्यार्थ्यांनी दिली.





कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शनात अंजली भोसले आणि प्रज्ञा कांबळे या विद्यार्थिनींनी फळे व भाजी वर्गीकरण करणाऱ्या यंत्राचे संशोधन सादर केले. दुसऱ्या छायाचित्रात विद्यापीठ, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

### प्रयोगशाळा खुल्या

विज्ञान दिनानिमित्त विद्यापीठातील भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, आदी विभागांतील सर्व प्रयोगशाळा विज्ञानप्रेमी नागरिकांसाठी खुल्या ठेवण्यात आल्या होत्या. अन्य विभागांतील काही विद्यार्थ्यांना या प्रयोगशाळांना भेट देऊन तेथील माहिती जाणून घेतली.

2 8 FEB 2019 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे कार्य कौतुकास्पद : डॉ. प्रशांत अमृतकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेने आपल्या सदस्यांना गरजेच्या वेळी मदतीचा हात दिला आहे. त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी जपत पतसंस्थेने शहीद जवानांसाठी आर्थिक मदत केली आहे, त्यांचे हे कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन करवीरचे पोलीस उपअधीक्षक डॉ. प्रशांत अमृतकर यांनी केले.

वि. स. खांडेकर सभागृहात मंगळवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सुवर्णमहोत्सवी सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. अमृतकर म्हणाले, एकत्र व परस्पर साहाय्याने कार्य करणे म्हणजे सहकार होय. सहकार हा खऱ्याअर्थाने अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सहकाराचे हे तत्त्व शिवाजी विद्यापीठाच्या कर्मचारी पतसंस्थेने जपले आहे.

पल्लवी कोरगावकर म्हणाल्या, भविष्यातील गरजा ओळखून आपण वाटचाल केली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञान जर आपण आत्मसात केले नाहीतर स्पर्धेच्या युगात मागे पडू, यासाठी आपण सतत अपडेट राहणे गरजेचे आहे. मेजर सुभाष सासणे म्हणाले, पतसंस्थेने केलेल्या कार्यातून देशभक्ती दिसून येते. आपल्या कार्यातून माणुसकी जपण्याचे काम केले आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुलवामा हल्ल्याच्या घटनेमुळे पतसंस्थेच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करून ५१ हजार रुपयांचा धनादेश जिल्हा सैनिक अधिकारी मेजर सुभाष सासणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष महेश सणगर यांनी स्वागत केले, तर उपाध्यक्ष गजानन चव्हाण यांनी आभार मानले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी चिटणीस अभिजित पाटील, संचालक राम तुपे, अजित इंगळे, अरविंद पाटील, उल्हास माने, विशांत भोसले, जनार्दन सुरकुले, रमेश नरके, अमोल चव्हाण, राजेंद्र चव्हाण, आदी उपस्थित होते.

लोकमत

# सहकार हा अर्थव्यवस्थेचा कणा : प्रशांत अमृतकर

## कर्मचारी पतसंस्थेच्या सुवर्णमहोत्सवाची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** प्रत्येकाने स्वत:पुरते व स्वतंत्रपणे कार्य न करता, अनेकांनी एकत्र व परस्पर साहाय्याने कार्य करणे म्हणजे सहकार होय. सहकार हा खऱ्या अर्थाने अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे प्रतिपादन करवीरचे पोलीस उपअधीक्षक डॉ. प्रशांत अमृतकर यांनी केले.

वि. स. खांडेकर सभागृहात मंगळवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सुवर्णमहोत्सवी सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. कोरगावकर ग्रुपच्या सीईओ पल्लवी कोरगावकर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर सुभाष सासणे, आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. अमृतकर म्हणाले, सहकाराचे हे तत्त्व शिवाजी विद्यापीठाच्या कर्मचारी पतसंस्थेने जपले आहे. सामाजिक बांधीलकी जपत पतसंस्थेने शहीद जवानांसाठी आर्थिक मदत केली आहे, हे कार्य कौतुकास्पद आहे.

पल्लवी कोरगावकर म्हणाल्या, भविष्यातील गरजा ओळखून आपण वाटचाल केली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञान जर आपण आत्मसात केले नाही, तर स्पर्धेच्या युगात मागे पडू, यासाठी आपण सतत अपडेट राहणे गरजेचे आहे. मेजर सुभाष सासणे म्हणाले, पंतसंस्थेने केलेल्या कार्यातून देशभक्ती दिसून येते. आपल्या कार्यातून माणुसकी जपण्याचे काम केले आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुलवामा हल्ल्याच्या घटनेमुळे पतसंस्थेच्या-वतीने सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करून ५१ हजार रुपयांचा धनादेश जिल्हा सैनिक अधिकारी मेजर सुभाष सासणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष महेश सणगर यांनी स्वागत केले, तर उपाध्यक्ष गजानन चव्हाण यांनी आभार मानले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी चिटणीस अभिजित पाटील, संचालक राम तुपे, अजित इंगळे, अरविंद पाटील, उल्हास माने, विशांत भोसले, जनार्दन सुरकुले, रमेश नरके, अमोल चव्हाण, राजेंद्र चव्हाण, आदी उपस्थित होते.